RNI No. MAHBIL /2009/31733

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-अ

वर्ष १२, अंक १३१] शुक्रवार, ऑक्टोबर ९, २०२६/आश्विन १७, शके १९४८ [पृष्ठे २६, किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक ४२६**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**उद्योग, गुंतवणूक, सेवा व खनिकर्म विभाग**

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई ४०० ०३२,
दिनांक ९ ऑक्टोबर २०२६.

**अधिसूचना**

**खाण व खनिज (विकास व विनियमन) अधिनियम, १९५७.**

क्रमांक एमएनजी-०३२५/प्र. क्र.१४/उद्योग-९ब.—**ज्याअर्थी,** भारत सरकारने, पत्र क्र. एफ.क्र. ६/३/२०२५-एनएमईटी- ५२८, दिनांक १९ नोव्हेंबर, २०२४ द्वारे, राज्य खनिज अन्वेषण न्यास (ट्रस्ट) ची स्थापना करण्याबाबत राज्य शासनास निदेश दिले आहेत ;

**आणि ज्याअर्थी,** महाराष्ट्र शासनाने, महाराष्ट्र राज्य खनिज अन्वेषण न्यास (ट्रस्ट) ची स्थापना करण्याचा निर्णय घेतला आहे.

**त्याअर्थी आता,** खाण व खनिजे (विकसन व विनियमन) अधिनियम, १९५७ याच्या कलम १५ च्या पोट-कलम (१क) च्या खंड (छ) तसेच कलम २०क अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र राज्य खनिज अन्वेषण न्यासाच्या स्थापनेच्या प्रयोजनार्थ पुढील नियम करीत आहे :—

१. **संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ—**

(१) या नियमांस, "महाराष्ट्र राज्य खनिज अन्वेषण न्यास नियम, २०२६", असे म्हणावे.

(२) या नियमांची व्याप्ती संपूर्ण महाराष्ट्र राज्यात असेल.

(३) ते, **शासकीय राजपत्रातील** त्याच्या प्रसिद्धीच्या दिनांकास अंमलात येतील.

२. **व्याख्या-**

(१) या नियमांत, संदर्भानुसार दुसरा अर्थ आवश्यक नसेल तर,—

(क) "अधिनियम" याचा अर्थ, खाण व खनिजे (विकसन व विनियमन) अधिनियम, १९५७ (१९५७ चा ६७), असा आहे ;

*(ख)* "अध्यक्ष, नियामक मंडळ" याचा अर्थ, महाराष्ट्र राज्य खनिज अन्वेषण न्यासच्या नियामक मंडळाचा अध्यक्ष, असा आहे;

*(ग)* "अध्यक्ष, कार्यकारी समिती" याचा अर्थ, महाराष्ट्र राज्य खनिज अन्वेषण न्यासच्या कार्यकारी समितीचा अध्यक्ष, असा आहे;

*(घ)* "विभाग" याचा अर्थ, महाराष्ट्र शासनाचा उद्योग, गुंतवणूक, सेवा व खनिकर्म विभाग, असा आहे;

*(ङ)* "निधी" याचा अर्थ, नियम ९ मध्ये उल्लेख केलेला निधी, असा आहे;

(च) "शासन" याचा अर्थ, महाराष्ट्र शासन, असा आहे;

(छ) "नियामक मंडळ" याचा अर्थ, न्यासचे नियामक मंडळ, असा आहे;

(ज) "कार्यकारी समिती" याचा अर्थ, न्यासचे कार्यकारी समिती, असा आहे;

(झ) "सदस्य, नियामक मंडळ" याचा अर्थ, महाराष्ट्र राज्य खनिज अन्वेषण न्यासच्या नियामक मंडळाचा सदस्य, असा आहे;

(ञ) "सदस्य, कार्यकारी समिती" याचा अर्थ, महाराष्ट्र राज्य खनिज अन्वेषण न्यासच्या कार्यकारी समितीचा सदस्य, असा आहे;

(ट) "भूवैज्ञानिक दृष्ट्या खनिज अनुकूल क्षेत्रे" याचा अर्थ, भारतीय भूवैज्ञानिक सर्वेक्षणाद्वारे, वेळोवेळी, निश्चित केलेली खनिज संभाव्यता असलेली क्षेत्रे, असा आहे;

(ठ) "न्यास" याचा अर्थ, खाण व खनिज (विकास व विनियमन) अधिनियम, १९५७ अन्वये राज्य शासनाने नियम 3 अन्वये स्थापन केलेला महाराष्ट्र राज्य खनिज अन्वेषण न्यास, असा आहे.

**३. न्यास ची स्थापना-**

महाराष्ट्र राज्य खनिज अन्वेषण न्यास या नावाने ओळखला जाणारा एक राज्यस्तरीय न्यास असेल. राज्यातील खनिज साधनसंपत्तीचा नियोजित विकास करणे आणि त्यांचे अन्वेषण करणे, हे या न्यास चे उद्दिष्ट असेल.

**४. नियामक मंडळाचे सदस्यत्व-**

*(१)* न्यासचे नियामक मंडळ पुढील सदस्यांचे मिळून बनलेले असेल: -

| | | |
|---|---|---|
| १. | खनिकर्म विभागाचे प्रभारी मंत्री | अध्यक्ष |
| २. | अपर मुख्य सचिव /प्रधान सचिव /सचिव (खनिकर्म) उद्योग, गुंतवणूक, | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| | सेवा व खनिकर्म विभाग, महाराष्ट्र शासन | |
| ३. | अपर मुख्य सचिव /प्रधान सचिव /सचिव, महसूल विभाग, महाराष्ट्र शासन | सदस्य |
| ४. | अपर मुख्य सचिव /प्रधान सचिव /सचिव, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन | सदस्य |
| ५. | अपर मुख्य सचिव /प्रधान सचिव /सचिव, वित्त विभाग, महाराष्ट्र शासन | सदस्य |
| ६. | व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ, नागपूर | सदस्य |
| ७. | उपमहासंचालक, भारतीय भूवैज्ञानिक सर्वेक्षण, (महाराष्ट्र युनिट) | सदस्य |
| ८. | मिनरल एक्सप्लोरेशन एंड कंसल्टेंसी लिमिटेड,नागपूर यांच्याकडून नामनिर्देशित केलेली व्यक्ती | सदस्य |
| ९. | महासंचालक, भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय, महाराष्ट्र शासन | सदस्य-सचिव. |

*(२)* नियामक मंडळाचा अध्यक्ष, खनिज अन्वेषण क्षेत्रात विशेष ज्ञान असणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस आमंत्रित करू शकतो. अशा आमंत्रित व्यक्तीला बैठकीमध्ये मतदानाचा कोणताही हक्क असणार नाही, परंतु ती शासनाने, वेळोवेळी, ठरविल्यानुसार, असे बैठक शुल्क आणि इतर भत्ते मिळण्यास हक्कदार असेल.

**५. कार्यकारी समितीचे सदस्य.-**

*(१)* न्यास ची कार्यकारी समिती पुढील सदस्यांची मिळून बनलेली असेल:-

| | | |
|---|---|---|
| १. | अपर मुख्य सचिव /प्रधान सचिव /सचिव (खनिकर्म), उद्योग, गुंतवणूक, सेवा व खनिकर्म विभाग, महाराष्ट्र शासन | अध्यक्ष |
| २. | महासंचालक, भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय, महाराष्ट्र शासन | सदस्य |
| ३. | संचालक, तांत्रिक समन्वयन, राज्य युनिट, महाराष्ट्र, भारतीय भूवैज्ञानिक सर्वेक्षण, (पश्चिम विभाग) | सदस्य |
| ४. | प्रादेशिक खाण नियंत्रक, भारतीय खाण ब्युरो, नागपूर यांचा प्रतिनिधी | सदस्य |
| ५. | महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ, नागपूर यांच्याकडून नामनिर्देशित केलेली व्यक्ती | सदस्य |
| ६. | मिनरल एक्सप्लोरेशन एंड कंन्सल्टेंसी लिमिटेड, नागपूर यांच्याकडून नामनिर्देशित केलेली व्यक्ती | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ७. | संचालक, महाराष्ट्र सुदूर संवेदन उपयोजन केंद्र, नागपूर | सदस्य |
| ८. | सहसचिव, (खनिकर्म), उद्योग, गुंतवणूक, सेवा व खनिकर्म विभाग, महाराष्ट्र शासन | सदस्य |
| ९. | सहसचिव/उपसचिव (खनिज), महसूल विभाग, महाराष्ट्र शासन | सदस्य |
| १०. | संचालक, भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय, महाराष्ट्र शासन | सदस्य- सचिव. |

*(२)* कार्यकारी समितीचा अध्यक्ष, खनिज अन्वेषण क्षेत्रात विशेष ज्ञान असणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस आमंत्रित करू शकतो. अशा आमंत्रित व्यक्तीला बैठकीमध्ये मतदानाचा कोणताही हक्क असणार नाही, परंतु ती शासनाकडून, वेळोवेळी, ठरविण्यात येतील अशा बैठक शुल्क आणि इतर भत्ते मिळण्यास हक्कदार असेल.

**६. न्यासची उद्दिष्टे व कार्ये.-**

*(१)* न्यास, खनिजांसाठी प्रादेशिक व तपशीलवार अन्वेषण पार पाडील आणि पुढील बाबींच्या समावेशासह आपल्या उद्दिष्टांची पूर्तता करण्यासाठी नियामक मंडळाला आवश्यक वाटतील असे उपक्रम हाती घेईल: -

*(एक)* भूपृष्ठाखाली खोलवर दडलेले खनिज साठे शोधणे, त्यांचे अन्वेषण करणे, ते बाहेर काढणे, त्यावर प्रक्रिया करणे त्यांची दर्जोन्नती करणे यांसाठी आखण्यात आलेल्या विशेष योजना कार्यक्रम व प्रकल्पांना निधी देणे;

*(दोन)* खनिज विकास, शाश्वत खाणकाम, प्रगत वैज्ञानिक व तांत्रिक पद्धतींचा अवलंब आणि खनिज निष्कर्षण धातुशास्त्र यांविषयी सुधारणा संबंधी योजना हाती घेणे;

*(तीन)* विशेषत: धोरणात्मक व महत्त्वाच्या खनिजांना(critical minerals) प्राधान्य देऊन, प्रादेशिक क्षेत्राचे पूर्वेक्षण व तपशीलवार अन्वेषण कार्य हाती घेणे;

*(चार)* न्यास च्या खनिज अन्वेषणासाठीच्या प्राधान्यक्रमांचा निर्णय घेण्यासाठी राज्य भूवैज्ञानिक कार्यक्रम मंडळाशी विचारविनिमय करणे;

*(पाच)* अन्वेषण कार्यक्रम अशा प्रकारे सुलभ करणे की अन्वेषित क्षेत्रे, या नियमांखाली तयार केलेल्या तरतुदींनुसार, खनिज सवलतींच्या मंजुरीसाठी घेता येतील;

*(सहा)* आधुनिक तंत्रज्ञानाद्वारे खोलवर असलेल्या खनिज साठ्यांसाठी उच्च-जोखमीचे अन्वेषण करण्यासह भूवैज्ञानिक दृष्ट्या खनिज अनुकूल असलेल्या क्षेत्रांमधील (जी ३) ब्राऊन फील्ड प्रादेशिक अन्वेषण प्रकल्प पूर्ण करणे सुलभ करणे;

*(सात)* संपूर्ण महाराष्ट्रात ज्या क्षेत्रांमध्ये जी ३ टप्प्यातील अन्वेषण पूर्ण झाले आहे, त्या क्षेत्रांमध्ये सविस्तर अन्वेषण (जी २ किंवा जी १) पूर्ण करण्यास प्रोत्साहन देणे;

*(आठ)* भूवैज्ञानिक दृष्ट्या खनिज अनुकूल असलेल्या क्षेत्रांचे आणि राज्याच्या उर्वरित भागाचे भूभौतिकीय, जमिनीवरील/हवाई सर्वेक्षण, ड्रोन सर्वेक्षण आणि भूरासायनिक सर्वेक्षण सुलभ करणे;

*(नऊ)* भू-विज्ञानातील संशोधनाला चालना देण्यासाठी आणि खनिज पूर्वेक्षणाचे मूल्यमापन करण्यासाठी राज्य खनिज नमुना साठवण केंद्र तयार करणे;

*(दहा)* अन्वेषण कार्यात गुंतलेल्या किंवा गुंतवल्या जाणाऱ्या अधिकाऱ्यांची तांत्रिक क्षमता वाढवण्यासाठी क्षमता बांधणी कार्यक्रम आयोजित करणे;

*(अकरा)* राज्याच्या खनिज साधनसंपत्तीचे संवर्धन, विकास व समुपयोजन करण्याच्या दृष्टीने नियामक मंडळाला आवश्यक किंवा इष्ट वाटतील अशा इतर प्रयोजनांसाठी न्यास निधीचा वापर करणे, किंवा तसे करण्यासाठी कार्यकारी समितीला प्राधिकृत करणे;

*(बारा)* राज्यातील खनिज साधनसंपत्तीचे व त्यांचा अन्वेषण नियोजित विकास करण्यासाठी अल्पकालीन, मध्यम मुदतीचे आणि दीर्घकालीन दृष्टिकोन व ध्येय आराखडे तयार करणे आणि अति महत्व्याच्या आणि धोरणात्मक खनिज अन्वेषण व निष्कर्षण प्रक्रिया आणि इतर संबंधित क्षेत्रांवर राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय कार्यशाळा आयोजित करणे;

*(तेरा)* खनिज विकास, शाश्वत खाणकाम, प्रगत वैज्ञानिक व तांत्रिक पद्धतींचा अवलंब आणि खनिज निष्कर्षण धातुशास्त्र यांविषयी विशेष प्रकल्प राबविणे व त्याबाबतच्या उपाययोजना हाती घेणे;

*(चौदा)* खनिज विश्लेषण व धातुक चाचणी क्षेत्रात संशोधन व विकास करणे, विभाग, सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम, खासगी खनिज उद्योग, संशोधन संस्था, प्रयोगशाळा इत्यादींकडून सादर केलेल्या खडक व खनिज नमुन्यांतील संबंधित अशुद्धींची ओळख पटविणे आणि रासायनिक, भौतिक चाचणी व उपकरणीय विश्लेषणाद्वारे खनिज व धातुकांच्या गुणवत्तेचे मूल्यांकन ना नफा-ना तोटा या तत्त्वावर पार पाडणे व त्याकरिता प्रयोगशाळा अधिक सुसज्ज व अद्ययावत करणे;

*(पंधरा)* अन्वेषण वाढविण्यासाठी विभागाच्या प्रयोगशाळा ह्या अत्याधुनिक कौशल्य प्रयोगशाळा, उपकरण/वाहन यांचे सक्षमीकरण व अद्ययावत करण्याची कार्यवाही सुरू करणे आणि नॅशनल

ॲक्रेडीटेशन बोर्ड फॉर टेस्टींग ॲण्ड कॅलीब्रेशन लॅबरोटेरीजकडून (एनएबीएल) अधिस्वीकृती मिळाल्यानंतर, खनिज आधारित उत्पादनांच्या निर्यातदारांना परीक्षण व विश्लेषणाच्या आधारे प्रमाणपत्र देणे;

*(सोळा)* न्यास ची कार्ये पार पाडण्यासाठी आवश्यकतेनुसार अधिकारी, भूवैज्ञानिक, शास्त्रज्ञ, तांत्रिक कर्मचारी, वित्तीय सल्लागार, व्यवस्थापन सल्लागार आणि इतर कर्मचाऱ्यांची प्रतिनियुक्तीवर / कंत्राटी तत्त्वावर नियुक्ती करणे;

*(सतरा)* खनिज अन्वेषण उपक्रम, क्षेत्रीय सर्वेक्षण, भूवैज्ञानिक अन्वेषण आणि न्यास ची इतर कार्ये पार पाडण्यासाठी वाहने व इतर आवश्यक वाहतूक सुविधा भाड्याने घेणे, भाडेपट्ट्याने घेणे किंवा खरेदी करणे;

*(अठरा)* राज्यासाठी राज्य खनिज निर्देशिका, राज्य खनिज नकाशासंग्रह/भू-माहिती खनिज संसाधन माहिती प्रणाली विकसित करणे आणि भूशास्त्रीय व इतर भू-वैज्ञानिक माहिती डिजिटल स्वरूपात सार्वजनिक जनव्यासपीठावर उपलब्ध करून देणे;

*(एकोणवीस)* निम्न दर्जाच्या खनिजांवर खनिज संस्करण व मूल्यवर्धन प्रकल्प हाती घेणे;

*(वीस)* खनिज उत्खननामध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आणि मशीन लर्निंग (एमएल) तंत्रज्ञानाचा अवलंब करणे, आणि राज्यातील खाण क्षेत्रांवर संनियंत्रण ठेवण्यासाठी ड्रोन संनिरीक्षण आणि ड्रोन-आधारित सर्वेक्षण यांसारख्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाची अंमलबजावणी करणे;

*(एकवीस)* नियामक मंडळाद्वारे वेळोवेळी मंजूर करण्यात आलेला इतर कोणताही उपक्रम.

*(२)* पोट-नियम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी, नियामक मंडळ कर्मचाऱ्यांना कामावर ठेवू शकते किंवा त्यांची नेमणूक करू शकते, बौद्धिक संपदेसह स्वतःची मालमत्ता घेऊ शकते व तिची विल्हेवाट लावू शकते, प्रशासकीय खर्च करू शकते आणि आवश्यकतेनुसार दस्तऐवज निष्पादित करू शकते.

**७. नियामक मंडळाची कार्ये.-**

*(१)* नियामक मंडळ, न्यासच्या कामकाजासाठी व्यापक धोरणात्मक आराखडा निर्धारित करील आणि त्याच्या कामकाजाचा आढावा घेईल.

*(२)* नियामक मंडळ, कार्यकारी समितीच्या शिफारशींवरून न्यास ची वार्षिक योजना व वार्षिक अर्थसंकल्प मंजूर करील आणि याची वर्षातून किमान एकदा बैठक होईल.

**८. कार्यकारी समितीची कार्ये.-**

*(१)* कार्यकारी समिती, न्यासचे व्यवस्थापन, प्रशासन व पर्यवेक्षण करील, तसेच न्यास निधीच्या खर्चाचे नियमित संनियंत्रण व पुनर्विलोकन करील.

*(२)* कार्यकारी समिती, आपली कार्ये पार पाडत असताना, वेळोवेळी नियामक मंडळाच्या धोरणात्मक आराखड्याचे आणि निदेशांचे पालन करील.

**९. न्यास अंतर्गत निधीची रचना:-**

*(१)* राज्य शासन, आदेशाद्वारे, न्यासच्या कार्यकारी समितीद्वारे व्यवस्थापन केला जाणारा, महाराष्ट्र राज्य खनिज अन्वेषण न्यास निधी म्हणून संबोधला जाणारा, न्यास अंतर्गत एक निधी उभारील.

*(२)* न्यास निधीमध्ये नियम १० च्या तरतुदींनुसार प्रदान करावयाची रक्कम प्राप्त करील आणि कार्यकारी समितीकडून मंजूर केल्या जाणाऱ्या इतर स्त्रोतांकडून मिळणारे अंशदान/सहाय्य देखील यामध्ये स्वीकारले जाऊ शकेल.

*(३)* न्यासला भारतीय रिझर्व्ह बँक अधिनियम, १९३४ (१९३४ चा २) च्या दुसऱ्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही अनुसूचित बँकेमध्ये स्वत:च्या नावाने बँक खाती उघडण्याचा आणि ती चालवण्याचा अधिकार असेल.

*(४)* न्यास हे प्राप्त रकमा आणि प्रदाने यांच्या प्रयोजनांसाठी आपल्या बँक खात्याचा तपशील संचालक, भूविज्ञान आणि खनिकर्म संचालनालय, महाराष्ट्र शासन याला कळवील.

*(५)* नियम ६ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या उद्दिष्टांसाठी व कार्यांसाठी निधीचा वापर केला जाईल.

**१०. न्यास निधीमधील अंशदान.—**

*(१)* गौण खनिजांचे खाणपट्टा धारक, खाण परवानाधारक आणि परवानाधारक हे त्यांना वाटप केलेल्या किंवा परवानगी दिलेल्या क्षेत्रामधून काढलेल्या आणि/किंवा उपभोग घेतलेल्या कोणत्याही खनिजाच्या बाबतीत, महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम, २०१३ च्या नियम ४६(१), नियम ६५(१) आणि नियम ८१ च्या अटींनुसार, स्वामित्वधनाच्या दोन टक्के रकमेइतके अंशदान न्यास निधीमध्ये जमा करतील.

*(२)* पोट-नियम (१) अन्वये न्यास निधीमध्ये करावयाचे प्रदान स्वामित्वधनासोबतच एका स्वतंत्र उप-शीर्षाखाली ई-प्रदानाद्वारे अग्रिम स्वरूपात वसूल केले जाईल आणि न्यासच्या खात्यात जमा केली जाईल

तसेच, स्वामित्वधनाच्या आकारणीच्या वेळी जर काही फरक आढळून आल्यास, अशा फरकाची दोन टक्के रक्कम त्वरित न्यासच्या खात्यात जमा केली जाईल.

*(३)* शासन, महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम, २०१३ च्या प्रकरण सात अन्वये आणि महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ (१९६६ चा महा. ४१) च्या कलम ४८(७)(८) अन्वये शास्ती म्हणून प्राप्त झालेल्या महसुलाच्या दहा टक्के रक्कम न्यासकडे हस्तांतरित करील.

*(४)* संबंधित जिल्हाधिकारी, महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम, २०१३ च्या नियम ८१ अन्वये आणि महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ (१९६६ चा महा. ४१) च्या कलम ४८ चे पोट-कलम (७) व (८), कलमे १७६, १७७, १७८, १७९, १८०, १८१ व १८२ अन्वये शास्ती/वसुली म्हणून वसूल केलेल्या रकमेच्या दोन टक्के रक्कम राज्य खनिज अन्वेषण न्यासच्या बँक खात्यात जमा करण्यास जबाबदार असेल.

*(५)* पोट-नियम (१), (२) व (४) अन्वये रकमेच्या वसुलीबाबत महसूल विभागाशी समन्वय साधण्यासाठी संबंधित जिल्हा खनिकर्म अधिकारी जबाबदार असेल. संबंधित जिल्हा खनिकर्म अधिकारी, लेखा पुस्तके आणि न्यासच्या खात्याच्या नोंदी ठेवील.

*(६)* भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय हे न्यासच्या बँक खात्यात हस्तांतरित केलेल्या रकमेची अद्ययावत नोंद ठेवील; तसेच अशा प्रकारे गोळा झालेल्या स्वामित्वधनाच्या माहितीचे संकलन करील आणि अशी माहिती नियतकालीक तत्वावर न्यासला पुरवील.

**११. कार्यालय व बँक खाते.-**

*(१)* न्यासचे कार्यालय नागपूर येथे किंवा कार्यकारी समितीद्वारे निर्धारित करण्यात येईल अशा इतर ठिकाणी असेल.

*(२)* न्यासचे बँक खाते भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय आणि विभागाचे वित्तीय सल्लागार किंवा कार्यकारी समितीद्वारे प्राधिकृत केलेल्या इतर कोणत्याही अधिकाऱ्यामार्फत उघडले जाईल व चालवले जाईल.

**१२. न्यासचे व्यवस्थापन. -**

*(१)* न्यासचे एकूण नियंत्रण, नियतकालिक पुनर्विलोकन आणि धोरणात्मक निदेश, नियामक मंडळाकडे निहित असतील.

*(२)* कार्यकारी समिती न्यासच्या दैनंदिन उपक्रमांचे व्यवस्थापन, प्रशासन व पर्यवेक्षण करील.

*(३)* नियामक मंडळ, पोट-नियम (१) मध्ये नमूद केलेले आपले कोणतेही किंवा सर्व अधिकार वापरण्यासाठी कार्यकारी समितीला प्राधिकृत करू शकेल.

*(४)* कार्यकारी समिती वित्तीय अधिकारांच्या प्रत्यायोजनासाठीची योजना तयार करील आणि तिला अंतिम रूप देईल.

**१३. समित्या. -**

*(१)* कार्यकारी समितीने समित्यांकडे किंवा उपसमित्यांकडे नेमून देण्यात येतील किंवा सोपविण्यात येतील अशी कामे हाती घेण्यासाठी, कार्यकारी समिती अशा समित्या किंवा उप-समित्या गठीत करील.

*(२)* पोट-नियम (१) अन्वये गठीत केलेली समिती किंवा उपसमिती या नियमांअन्वये कर्तव्ये व जबाबदाऱ्या पार पाडताना आणि कार्यकारी समितीद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा अधिकारांचा व कार्यांचा वापर करताना स्वतःची कार्यपद्धती तयार करील.

**१४. कार्यकारी समितीद्वारे निश्चित केलेल्या प्रकल्पांची अंमलबजावणी.-**

*(१)* कार्यकारी समिती, त्यांच्या स्वतःच्या एकमतानुसार, न्यासच्या उद्दिष्टांशी एकरूप असणाऱ्या प्रकल्पांची किंवा भूविज्ञान व खनिकर्म संचालकाकडून किंवा इतर कोणत्याही संस्थेकडून, खाजगी क्षेत्रातील संस्थांच्या समावेशासह, एखाद्या प्रकल्पाचा प्रस्ताव प्राप्त झाल्यावर अंमलबजावणी करील.

*(२)* पोट-नियम (1) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रकल्पांच्या अंमलबजावणी मध्ये, कार्यकारी समिती, अधिनियम व त्याखाली तयार केलेल्या नियमांची सुसंगत असलेली त्यांची स्वतःची कार्यपद्धती तयार करील.

**१५. प्रकल्पांच्या समन्वेषनाचे संनियंत्रण.-**

(1) न्यास, प्रकल्पांच्या अंमलबजावणीचे संनियंत्रण, एकतर स्वतः किंवा कोणत्याही शासकीय संस्थेला नियुक्त करून करील.

*(२)* पोट-नियम (1) च्या प्रयोजनार्थ, न्यास, अधिनियम व त्याखाली तयार केलेल्या नियमांची सुसंगत असलेली त्यांची स्वतःची कार्यपद्धती तयार करील.

**१६. नियामक मंडळाच्या बैठकी.-**

(1) नियामक मंडळाची वर्षातून किमान एकदा बैठक होईल.

(२) नियामक मंडळाच्या बैठकीचे अध्यक्षस्थान नियामक मंडळाच्या अध्यक्षाद्वारे भूषविले जाईल आणि नियामक मंडळाच्या अध्यक्षाच्या अनुपस्थितीत; नियामक मंडळाचे पदसिद्ध सदस्य त्यांच्यामधून एकाची अध्यक्ष म्हणून निवड करतील.

(3) नियामक मंडळाच्या परिपत्रक ठरावांसह सर्व निर्णय किंवा ठराव, सर्वसामान्य मताद्वारे तयार केले जातील किंवा स्वीकारले जातील.

(4) कोणतीही असहमती किंवा मतभिन्नता असल्यास, नियामक मंडळाच्या अध्यक्षाचा अधिनिर्णय अंतिम असेल.

**१७. कार्यकारी समितीच्या बैठका.-**

(1) कार्यकारी समितीची प्रत्येक तीन महिन्यातून किमान एकदा बैठक होईल.

(2) कार्यकारी समितीच्या बैठकीचे अध्यक्षस्थान कार्यकारी समितीच्या अध्यक्षाद्वारे भूषविले जाईल आणि कार्यकारी समितीच्या अध्यक्षाच्या अनुपस्थितीत; कार्यकारी समितीचे पदसिद्ध सदस्य त्यांच्यामधून एकाची अध्यक्ष म्हणून निवड करतील.

(3) कार्यकारी समितीची बैठक, एकतर प्रत्यक्ष किंवा आभासी किंवा प्रसारणाद्वारे(by circulation) किंवा दोन्हींच्या संयोगाद्वारे होईल:

परंतु, प्रसारणाद्वारे घेतली जाणारी बैठक, न्यासचे लेखे स्वीकारण्याकरिता, न्यासची वार्षिक योजना, वार्षिक अंदाजपत्रक व वार्षिक अहवालाच्या मान्यतेकरिता नियामक मंडळाकडे शिफारस करणे यांकरीता लागू नसेल.

(4) कार्यकारी समितीचे सर्व निर्णय किंवा ठराव, प्रसारणाच्या ठरावासह कार्यकारी समितीच्या उपस्थित असणाऱ्या व मतदान करणाऱ्या सदस्यांच्या मताधिक्याद्वारे तयार केले जातील किंवा स्वीकारले जातील.

(5) समसमान मतांच्या बाबतीत, कार्यकारी समितीचा अध्यक्ष किंवा त्याच्या अनुपस्थितीत अशा बैठकीचे अध्यक्षपद भूषविणाऱ्या सदस्याचे मत निर्णायक असेल:

परंतु, जर एखादी बाब, ज्यामध्ये, कोणताही प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष किंवा आर्थिक हितसंबंध असलेला सदस्य असेल तर, त्या सदस्यास, कार्यकारी समिती किंवा तिच्या कोणत्याही समित्या किंवा उपसमित्यांच्या बैठकीवेळी विचारात घेण्यात येणाऱ्या कोणत्याही बाबीच्या चर्चेमध्ये मत देता येणार नाही किंवा भाग घेता येणार नाही.

**१८. नियामक मंडळ व कार्यकारी समितीच्या बैठकीची नोटीस व कार्यसूची.-**

(1) नियामक मंडळाचे अध्यक्ष किंवा संयोजक, नियामक मंडळाच्या अध्यक्षाच्या परवानगीने, सर्व सदस्यांना किमान पंधरा दिवसांची नोटीस देऊन नियामक मंडळाची बैठक बोलावतील:

परंतु, नियामक मंडळाचे अध्यक्ष, अल्पमुदतीची नोटीस देऊन बोलविण्यात येणारी बैठक प्राधिकृत करतील.

(2) कार्यकारी समितीचे अध्यक्ष किंवा सदस्य सचिव, अध्यक्षाच्या संमतीने, सर्व सदस्यांना किमान सात दिवसांची नोटीस देऊन कार्यकारी समितीची बैठक बोलावतील:

परंतु, कार्यकारी समितीचे अध्यक्ष, अल्पमुदतीची नोटीस देऊन बोलविलेली बैठक प्राधिकृत करतील.

(3) कोणत्याही बैठकीची नोटीस, ज्यामध्ये बैठकीचे इतिवृत्त, आधीच्या बैठकीच्या इतिवृत्ताचा मसुदा व आधीच्या बैठकीच्या इतिवृत्ताच्या अहवालावर केलेली कार्यवाही यांचा समावेश असेल.

**१९. बैठकीची गणपूर्ती.-**

(1) नियामक मंडळाच्या कोणत्याही बैठकीची गणपूर्ती, विशेष निमंत्रित व्यक्ती वगळता चार इतकी असेल.

(2) नियामक मंडळाच्या आभासी बैठकीसह कोणत्याही बैठकीची गणपूर्ती, नामनिर्देशित सदस्य वगळता चार इतकी असेल.

**२०. कार्यकारी समितीच्या सदस्य-सचिवांचे अधिकार, कर्तव्ये व जबाबदाऱ्या.-**

(1) कार्यकारी समितीची कार्ये पार पाडण्यासाठी कार्यकारी समितीचा एक सदस्य-सचिव असेल.

(2) कार्यकारी समितीचा सदस्य-सचिव,-

अ) कार्यकारी समितीच्या पर्यवेक्षण, नियंत्रण आणि मार्गदर्शनाखाली न्यासचा कारभार पाहील आणि व्यवस्थापन करील.

ब) कार्यकारी समितीने प्रदान केलेले किंवा कार्यकारी समितीच्या अध्यक्षांनी सोपवलेले असे प्रशासकीय आणि वित्तीय अधिकार वापरील.

(3) कार्यकारी समितीच्या सदस्य-सचिवाची पुढील कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या असतील : -

अ) वार्षिक योजना आणि संबंधित वार्षिक अर्थसंकल्प तयार करून घेणे आणि ते कार्यकारी समितीकडे विचारार्थ व नियामक मंडळाकडे शिफारशीसाठी सादर करणे;

ब) कार्यकारी समितीच्या कार्यपद्धती, प्रक्रिया, नियम किंवा निदेशांनुसार न्यास द्वारे हाती घेण्यात येणाऱ्या प्रस्तावांवर किंवा प्रकल्पांवर विचार करण्यापूर्वी योग्य ती खबरदारी घेण्यात आली आहे, याची खातरजमा करणे;

क) न्यासचे उपक्रम वार्षिक योजना आणि संबंधित वार्षिक अर्थसंकल्पानुसार चालवले जात आहेत याची खातरजमा करणे;

ड) प्रत्येक वित्तीय वर्षासाठीची मंजूर वार्षिक योजना व संबंधित वार्षिक अर्थसंकल्प, मागील वित्तीय वर्षाच्या जानेवारी महिन्याच्या अखेरपर्यंत शासनास सादर करण्यासाठी नियामक मंडळाकडे सादर करणे.

**२१. वार्षिक योजना -**

(1) कार्यकारी समितीचे सदस्य-सचिव, प्रत्येक वित्तीय वर्षाच्या सुरुवातीला, न्यास द्वारे संबंधित वित्तीय वर्षात हाती घेण्यात येणाऱ्या अल्पकालीन आणि दीर्घकालीन प्रकल्पांसाठी योजना तयार करून घेईल, तिचा उल्लेख  वार्षिक योजना असा केला जाईल. त्यासोबत त्या कालावधीत न्यास द्वारे हाती घेण्यात येणाऱ्या किंवा पूर्ण करण्यात येणाऱ्या उपक्रमांचा तपशील, प्रकल्प पूर्ण होण्याचा अपेक्षित कालावधी आणि अशा प्रकल्पाचा खर्च यांचा समावेश असेल.

(2) वार्षिक योजनेमध्ये न्यासने आपली उद्दिष्टे साध्य करण्यासाठी हाती घेण्याचे प्रस्तावित केलेले सर्व प्रकल्प, कार्यक्रम आणि उपक्रम समाविष्ट असतील आणि त्यात स्पष्टपणे निश्चित केलेले टप्पे असतील.

**२२. वार्षिक अर्थसंकल्प.-**

कार्यकारी समितीचे सदस्य-सचिव, प्रत्येक वित्तीय वर्षाच्या सुरुवातीला, वार्षिक अर्थसंकल्प तयार करून घेतील, त्यामध्ये त्या विशिष्ट वित्तीय वर्षासाठीच्या वार्षिक योजनेत समाविष्ट असलेल्या उपक्रमांवरील प्रस्तावित उत्पन्न आणि खर्चाचा तपशील तसेच न्यास द्वारे प्रस्तावित कायदेशीर, प्रशासकीय आणि इतर खर्च व व्यय, तसेच या संदर्भातील निधीच्या आवश्यकतेचा तपशील समाविष्ट असेल, त्याचा उल्लेख वार्षिक अंदाजपत्रक असा केला जाईल.

**२३. वार्षिक योजनेला आणि वार्षिक अर्थसंकल्पाला मंजुरी.-**

(1) वार्षिक योजना आणि वार्षिक अर्थसंकल्प मंजुरीसाठी  नियामक मंडळासमोर सादर केले जातील.

(2) कार्यकारी समितीचा सदस्य-सचिव, नियामक मंडळाच्या निमंत्रकाकडून यथोचितरीत्या मंजूर केलेल्या वार्षिक योजनेच्या आणि संबंधित वार्षिक अर्थसंकल्पाच्या प्रती प्राप्त झाल्यावर, नियामक मंडळाची मंजुरी मिळाल्याच्या तारखेपासून तीस दिवसांच्या कालावधीत ते राज्य शासनाकडे सादर करील.

(3) पोट-नियम (2) च्या तरतुदींना बाध न आणता, न्यास, वार्षिक योजनेत मंजूर नसलेल्या उपक्रमांवर नियामक मंडळाच्या अध्यक्षांच्या विनिर्दिष्ट मंजुरीच्या अधीन राहून खर्च करू शकेल, तो खर्च नियामक मंडळाच्या पुढील वार्षिक अर्थसंकल्पात नियामक मंडळासमोर ठेवण्यात येईल.

(4) वार्षिक योजना आणि संबंधित वार्षिक अर्थसंकल्पात नियामक मंडळाच्या अध्यक्षांच्या मंजुरीच्या अधीन राहून सुधारणा केली जाऊ शकेल व ती पुढील वार्षिक योजनेत किंवा अर्थसंकल्पात नियामक मंडळासमोर ठेवण्यात येईल.

**२४. वार्षिक अहवाल.-**

(1) कार्यकारी समितीचा सदस्य सचिव, प्रत्येक वित्तीय वर्षाच्या समाप्तीनंतर नव्वद दिवसांच्या आत, कार्यकारी समितीला योग्य वाटेल अशी माहिती असलेला वार्षिक अहवाल सादर करील.

(2) वार्षिक अहवाल कार्यकारी समितीद्वारे मंजूर करण्यात येईल आणि त्यामध्ये इतर गोष्टींबरोबरच, न्यासने वित्तीय वर्षात पूर्ण केलेल्या उपक्रमांचा आणि त्या वित्तीय वर्षात न्यासने केलेल्या खर्चाचा तपशील असेल.

(3) नियामक मंडळाच्या मंजुरीनंतर कार्यकारी समितीने वार्षिक अहवालास मंजुरी दिल्याच्या तारखेपासून तीस दिवसांच्या कालावधीत त्याची एक प्रत शासनाकडे पाठविण्यात येईल.

**२५. वित्तीय वर्ष.-**

(1) न्यासचे लेखांकन किंवा वित्तीय वर्ष 1 एप्रिल पासून ते 31 मार्च पर्यंत असेल.

(2) न्यासच्या कामकाजाचे पहिले वर्ष अर्धवार्षिक असू शकेल.

**२६. लेख्यांचे जतन व लेखापरीक्षण.-**

(1) न्यासचे लेखे कार्यकारी समितीद्वारे ठरविण्यात येईल त्या स्वरूपात, पद्धतीने आणि रीतीने ठेवण्यात येतील.

(2) न्यासच्या निधीच्या लेख्यांचे लेखापरीक्षण कार्यकारी समितीद्वारे ठरविण्यात येईल अशा रीतीने करण्यात येईल.

(3) पोट-नियम (2) मध्ये उल्लेखिलेल्या लेखापरीक्षेनंतर, न्यास, नियामक मंडळाला वार्षिक अहवाल सादर करील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**लक्ष्मीकांत ढोके,**
शासनाचे सहसचिव.

**INDUSTRIES, INVESTMENT, SERVICES AND MINING DEPARTMENT**

Mantralaya, Madam Cama, Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, dated the 9th October 2026

*NOTIFICATION*

Mines and Minerals (Development and Regulation) Act, 1957.

No. MNG-0325/C.R.14/Industry-9B.—**Whereas,** the Government of India *vide* letter No. F.No. 6/3/2025-NMET- 528, dated 19th November 2024 has directed to the State Government to establish the State Mineral Exploration Trust ;

**And Whereas,** the Government of Maharashtra has decided to establish the Maharashtra State Mineral Exploration Trust;

**Now therefore,** in exercise of the powers conferred under clause (g) of sub-section (1A) of section 15 read with section 20A of the Mines and Minerals (Development and Regulation) Act, 1957, the Government of Maharashtra hereby makes following rules for the purpose of establishment of the Maharashtra State Mineral Exploration Trust, namely:-

1. **Short title, extent and commencement-**

   *(1)* These rules may be called the Maharashtra State Mineral Exploration Trust Rules, 2026.

   *(2)* These rules shall extend to the entire State of Maharashtra.

   *(3)* They shall come into force on the date of their publication in the *Official Gazette.*

2. **Definitions-**

   *(1)* In these rules, unless the context to otherwise requires,-

   *(a)* "Act" means the Mines and Minerals (Development and Regulation) Act, 1957 (67 of 1957);

   *(b)* "Chairperson, Governing Body" means the Chairperson of the Governing Body of the Maharashtra State Mineral Exploration Trust;

   *(c)* "Chairperson, Executive Committee" means the Chairperson of the Executive Committee of the Maharashtra State Mineral Exploration Trust;

   *(d)* "Department" means the Industries, Investment,Services and Mining Department of the Government of Maharashtra;

   *(e)* "Fund" means the fund referred to in rule 9;

   (f) "Government" means the Government of Maharashtra;

   *(g)* "Governing Body" means the Governing Body of the Trust;

   *(h)* "Executive Committee" means the Executive Committee of the

Trust;

*(i)* "Member, Governing Body" means the member of the Governing Body of the Trust;

*(j)* "Member, Executive Committee" means the member of the Executive Committee of the Trust;

*(k)* "Obvious geological potential areas" means the minerals potential areas identified by the Geological Survey of India, from time to time;

*(l)* "Trust" means the Maharashtra State Mineral Exploration Trust established under rule 3 by State Government under Section 15 of the Mines and Minerals (Regulation and Development) Act, 1957.

**3. Establishment of Trust-**

There shall be a Trust at the State level to be known as the Maharashtra State Mineral Exploration Trust. The object of the Trust shall be the planned development of the mineral resources and their exploration in the State.

**4. Membership of Governing Body-**

*(1)* The Governing Body of the Trust shall consist of the following, namely: -

| | | |
|---|---|---|
| 1. | Minister-in-charge of the Mining Department | Chairperson |
| 2. | Additional Chief Secretary/Principal Secretary/Secretary (Mining) Industries, Investment, Services and Mining Department, Government of Maharashtra | Member |
| 3. | Additional Chief Secretary/Principal Secretary/ Secretary, (Revenue) Revenue Department, Government of Maharashtra | Member |
| 4. | Additional Chief Secretary/Principal Secretary/ Secretary, Environment & Climate Change Department, Government of Maharashtra | Member |
| 5. | Additional Chief Secretary/Principal Secretary/ Secretary, Finance Department, Government of Maharashtra | Member |
| 6. | Managing Director, Maharashtra State Mining Corporation, Nagpur | Member |
| 7. | Deputy Director General, Geological Survey of India | Member |

| | | |
|---|---|---|
| | (Maharashtra Unit) | |
| 8. | Nominee from Mineral Exploration Corporation Limited, Nagpur | Member |
| 9. | Director General, Directorate of Geology and Mining, Nagpur | Member-Secretary. |

*(2)* The Chairperson of the Governing Body may invite any person having special knowledge in the field of Mineral Exploration. Such invitee shall have no voting right in the meeting but they shall be entitled to receive such sitting fee and other allowances as may be decided by the Government, from time to time.

**5. Member of Executive Committee. -**

(1) The Executive Committee of the Trust shall consist of the following, namely:-

| | | |
|---|---|---|
| 1. | Additional Chief Secretary/Principal Secretary/Secretary (Mining), Industry, Investment, Services and Mining Department | Chairperson |
| 2. | Director General, Directorate of Geology and Mining, Nagpur. | Member |
| 3. | Director, Technical coordination, State Unit, Maharashtra, Geological Survey of India (WR) | Member |
| 4. | Representative of the Regional Controller of Mines, Indian Bureau of Mines ,Nagpur | Member |
| 5. | Nominee from Maharashtra State Mining Corporation, Nagpur | Member |
| 6. | Nominee from Mineral Exploration Corporation limited, Nagpur | Member |
| 7. | Director, Maharashtra Remote Sensing Application Centre, Nagpur | Member |
| 8. | Joint Secretary, (Mining), Industries, Investment, Services and Mining Department, Government of Maharashtra | Member |
| 9. | Joint Secretary,(Revenue), Revenue | Member |

| | | |
|---|---|---|
| | Department, Government of Maharashtra | |
| 10. | Director, Directorate of Geology and Mining, Nagpur | Member Secretary. |

(2) The Chairperson of the Executive Committee may invite any person having special knowledge in the field of Mineral Exploration. Such invitees shall have no voting right in the meeting but they shall be entitled to receive such sitting fee and other allowances as may be decided by the Government, from time to time.

*6.* **Objectives and functions of Trust. -**

*(1)* The Trust shall carry out regional and detailed exploration for minerals and it shall undertake such activities as may be deemed necessary by the Governing Body to achieve its objects including: -

*(i)* funding special studies and projects designed to identify, explore, extract, beneficiate and refine deep seated or concealed mineral deposits;

*(ii)* undertaking studies for mineral development, sustainable mining adoption of advanced scientific and technological practices and mineral extraction metallurgy;

*(iii)* taking up exploration of areas for regional and detailed exploration, giving priority particularly to strategic and critical minerals;

*(iv)* consulting State Geological Programming Board to decide the priorities for exploration of the Trust;

*(v)* facilitating exploration activities in such a manner that areas explored can be taken up for grant of mineral concessions in accordance with the provisions of these rules made hereunder;

*(vi)* facilitating completion of brown field regional exploration projects in obvious geological potential areas (G3) including conducting high-risk exploration for deep-seated mineral deposits through modern technologies;

*(vii)* promoting completion of detailed exploration (G2 or G1) across Maharashtra in the areas where G3 stage exploration has been completed;

*(viii)* facilitating geophysical, ground/aerial survey, Drone Survey and geochemical survey of obvious geological potential areas and rest

of State;

*(ix)* facilitating a state core repository for encouraging research in earth sciences and for evaluation of the mineral prospects;

*(x)* organizing capacity building programs to raise technical capability of personnel engaged in or to be engaged in exploration;

*(xi)* using the Trust Fund for such other purposes that the Governing Body may decide, or authorize the Executive Committee, to be necessary or expedient in the interest of conservation; development and exploitation of mineral resources of State;

*(xii)* to prepare vision and mission plans of short term, mid-term and long term for the planned development of mineral resources and their exploration in the State and to conduct National or International workshops on critical or strategic minerals exploration and extraction processes and other related sectors;

*(xiii)* to undertake study and advocacy of mineral development, sustainable mining, adoption of advanced scientific and technological practices and mineral extraction metallurgy;

*(xiv)* to undertake research and development in the field of mineral analysis and testing of ores, identification of associated impurities of rocks and mineral samples submitted by the Department, public sector undertakings, private sector mineral industries, research institutions, laboratories etc. so as to assess quality of ores, minerals by chemical, physical testing and instrumental analysis on no profit no loss basis;

*(xv)* to initiate action to strengthen and upgrade the Department laboratory advanced state of the art laboratory, equipment/ vehicle for strengthen exploration and to provide certificate on the basis of testing and analysis to exporters of mineral based products after obtaining accreditation from National Accreditation Board for Testing and Calibration Laboratories (NABL);

*(xvi)* to appoint officers, geologists, scientists, technical persons, financial consultants, management consultants and other employees as are necessary for carrying out the functions of the Trust on deputation/contractual basis;

*(xvii)* to hire, lease, or procure vehicles and other necessary transport facilities for carrying out mineral exploration activities, field surveys, geological investigations, and other functions of the Trust;

*(xviii)* to develop State Mineral Directory, State Mineral Atlas/Geo-

Informatics Mineral Resource Information System for the State and putting up geological and other geo scientific data in digital formats for public domain;

*(xix)* to undertake mineral beneficiation and value addition studies on low grade minerals;

*(xx)* adoption of Artificial Intelligence (AI) and Machine Learning (ML) technologies in mineral exploration, and implementation of state-of-the-art technologies such as drone surveillance and drone-based surveys for monitoring mining areas within the State;

*(xxi)* any other activity approved by the Governing Body from time to time.

*(2)* In furtherance of the objectives referred to in sub-rule *(1)*, the Governing Body may employ or hire personnel, own and dispose of property, including intellectual property, incur administrative expenses and execute documents as may be necessary.

*7.* **Functions of the Governing Body. -**

*(1)* The Governing Body shall lay down the broad policy framework for the functioning of the Trust and review its working.

*(2)* The Governing Body shall approve the annual plan and annual budget of the Trust on the recommendations of the Executive Committee and it shall meet at least once in a year.

*8.* **Functions of the Executive Committee.-**

*(1)* The Executive Committee shall manage, administer and supervise the Trust, shall also monitor and review the expenditure of the Trust fund at regular intervals.

*(2)* The Executive Committee shall, while discharging its functions, follow the policy framework and the directions of the Governing Body, from time to time.

*9.* **Constitution of a fund under the Trust: -**

*(1)* The State Government shall, by order, setup a fund under the Trust to be called as the Maharashtra State Mineral Exploration Trust Fund to be managed by the Executive Committee of the Trust.

*(2)* The Trust Fund shall receive amount to be paid in accordance with the provisions of rule 10 and may also receive contribution/aids from sources as may be approved by the Executive Committee.

*(3)* The Trust shall have power to open and operate bank accounts in its own name at any Scheduled Bank as specified in the Second Schedule to the Reserve Bank of India Act, 1934 (2 of 1934).

*(4)* The Trust shall communicate the particulars of its bank account to

the Director, Directorate of Geology and Mining, Government of Maharashtra for the purposes of receipts and payments.

*(5)* The Fund shall be utilized for the objectives and functions as specified in rule 6.

***10.*** **Contribution to Trust Fund.-**

*(1)* The mining lease holders, quarry licensee and permit holders of minor minerals shall pay the contribution to the Trust fund in respect of any mineral removed by him from and/or consumed within the area allotted or permitted to him, a sum equivalent to two percent of the royalty in terms of the rule 46(1), rule 65(1) and rule 81 of Maharashtra Minor Minerals Extraction (Development and Regulation) rules 2013.

*(2)* The payment towards trust fund under sub-rule (1) shall be collected in advance along with royalty under a separate sub-head through e-payment and deposited in the account of trust and also if any difference is accrued at the time of assessment of royalty, the two percent of the difference shall be deposited in the account of trust immediately.

*(3)* The Government shall transfer ten percent of revenue received under Chapter VII of the Maharashtra Minor Minerals Extraction (Development and Regulation) Rules 2013, and section 48 (7)(8) of the Maharashtra Land Revenue Code, 1966 (Mah. XLI of 1966) as penalty, to the Trust.

*(4)* The concerned District Collector shall be responsible for depositing the two percent of amount collected as penalty/recovery in bank account of SMET under Rules 81 of Maharashtra Minor Minerals Extraction (Development and Regulation) Rules 2013, and under sub-section (7) and (8) of section 48, sections 176, 177, 178, 179, 180, 181 and 182 of Maharashtra Land Revenue Code, 1966 (Mah. XLI of 1966).

*(5)* The concerned District Mining Officers will be responsible for coordinating with the Revenue Department regarding the recovery of the amounts under sub-rules *(1)*, *(2)*, and *(4)*. The concerned District Mining Officers shall maintain books of accounts and its deposit in the Trust account.

*(6)* The Directorate of Geology and Mining shall maintain an updated record of the amount transferred to the bank account of the Trust along with a database of royalty so collected and provide such information to the Trust on a periodic basis.

*11.* **Office and Bank Account.-**

*(1)* The office of the Trust shall be situated at Nagpur or at such other place as may be determined by the Executive Committee.

*(2)* The Bank Account of Trust shall be opened and operated through the Directorate of Geology and Mining and Financial Advisor of the department or any other officer authorized by the Executive Committee.

*12.* **Management of the Trust. -**

*(1)* The overall control, periodical reviews and policy direction of the Trust shall vest with the Governing Body.

*(2)* The Executive Committee shall manage, administer and supervise the day today activities of the Trust.

*(3)* The Governing Body may authorize the Executive Committee to exercise any or all of its Power as mention in sub-rule *(1)*.

*(4)* The Executive Committee shall formulate and finalize the scheme for delegation of financial powers.

*13.* **Committees. -**

*(1)* The Executive Committee may constitute committees or sub-committees to undertake such tasks that may be assigned or delegated by the Executive Committee to such committees or sub-committees.

*(2)* The committee or sub-committee constituted under sub-rule *(1)* shall devise its own procedure in the discharge of the duties and responsibilities under these rules and in exercise of such powers and functions as may be specified by the Executive Committee.

*14.* **Implementation of identified projects by the Executive Committee.-**

*(1)* The Executive Committee may implement the projects consistent with the objectives of the Trust on its own accord or upon receipt of a project proposal from the Directorate of Geology and Mining or any other entity, including private sector entities.

*(2)* In implementation of the projects referred to in sub-rule *(1)*, the Executive Committee shall devise its own procedure consistent with the Act and rules made there under.

*15.* **Monitoring of exploration projects.-**

*(1)* The Trust shall monitor the implementation of the projects either by itself or by engaging any Government entity.

*(2)* For the purposes of sub-rule *(1)*, the Trust may devise its own procedure consistent with the Act and rules made hereunder.

*16.* **Meetings of the Governing Body.-**

*(1)* The Governing Body shall meet at least once in a year.

*(2)* The meetings of the Governing Body shall be presided by the Chairperson, Governing Body and in the absence of the Chairperson, Governing Body; the *ex-officio* Members of the Governing Body may elect an officiating Chairperson, from among themselves.

*(3)* All decisions or resolutions including circular resolutions of the Governing Body shall be made or adopted by consensus.

*(4)* In case of any disagreement or dissent, the ruling of the Chairperson, Governing Body shall be final.

*17.* **Meetings of the Executive Committee. -**

*(1)* The Executive Committee shall meet at least once in every three months.

*(2)* The meetings of the Executive Committee shall be presided by the Chairperson, Executive Committee and in the absence of the Chairperson, Executive Committee; the *ex-officio* Members of the Executive Committee may elect an officiating Chairperson, from among themselves.

*(3)* The meetings of the Executive Committee may be either physical or virtual or by circulation or by combination of both:

**Provided that,** the meeting by circulation shall not apply for adoption of accounts of the Trust, recommendation to Governing Body for approval of annual plan, annual budget **and** annual report of the Trust.

*(4)* All decisions or resolutions including circular resolutions of the Executive Committee shall be made or adopted by a majority of votes of the members of the Executive Committee present and voting.

*(5)* In case of equality of votes, the Chairperson, Executive Committee, or in his absence, the member presiding over such meeting as the Chairperson shall have a casting vote:

**Provided that,** no member shall vote or take part in the discussion of any matter coming up for consideration at a meeting of the Executive Committee **or** any of its committees **or** sub-committees, if the matter is one in which such member has any direct, indirect or pecuniary interest.

*18.* **Notice and agenda for meeting of Governing Body and Executive Committee. -**

*(1)* The Chairperson or the Convener of the Governing Body with the

consent of the Chairperson, Governing Body, shall convene the meeting of the Governing Body by giving a minimum fifteen days' notice to all the members:

**Provided that,** the Chairperson of the Governing Body may authorize a meeting to be convened with shorter notice.

*(2)* The Chairperson or Member Secretary of the Executive Committee with consent of the Chairperson shall convene meeting of the Executive Committee by giving a minimum seven days' notice to all members:

**Provided that,** Chairperson of the Executive Committee may authorize to convene a meeting with a shorter notice period.

*(3)* Notice for any meeting may include an agenda for the meeting, draft minutes of the earlier meeting and action taken report on the minutes of the earlier meeting.

*19.* **Quorum for meeting.-**

*(1)* The quorum for any meeting of the Governing Body shall be four, excluding the Special invitees.

*(2)* The quorum for any meeting of the Executive Committee, including virtual meeting, shall be four, excluding the nominated members.

*20.* **Powers, duties and responsibilities of Member Secretary of Executive Committee;**

*(1)* There shall be Member - Secretary of the Executive Committee to discharge the functions of the Executive Committee.

*(2)* The Member - Secretary of the Executive Committee shall-

*a)* Administer and manage the Trust subject to the superintendence, control and direction of the Executive Committee.

*b)* Exercise such administrative and financial powers as may be delegated by the Executive Committee or as may be assigned by the Chairperson, Executive Committee.

*(3)* The Member Secretary of the Executive Committee shall have the following duties and responsibilities, namely: -

*a)* To cause the preparation of the annual plan and related annual budget and submit them to the Executive Committee for consideration and recommendation to the Governing Body;

*b)* To ensure due diligence has been exercised before considering proposals or projects to be undertaken by the Trust in accordance with the practices, procedure, rules or

directions of the Executive Committee;

*c)* To ensure that the activities of the Trust are being conducted in accordance with the annual plan and related annual budget;

*d)* To submit to the Governing Body the annual approved plan and related annual budget for each financial year to the Government, by the end of January of previous financial year.

*21.* **Annual Plan -**

*(1)* The Member-Secretary of the Executive Committee shall, at the beginning of each financial year, cause preparation of plans for short term projects and long term projects proposed to be undertaken by the Trust in the relevant financial year, to be referred as the annual plan, together with details of the activities to be undertaken or completed by the Trust during such time, the expected time for completion of the projects and cost for such project.

*(2)* The annual plan shall contain all projects, programs; activities proposed to be undertaken by the Trust for achieving its objectives and shall have clearly demarcated milestones.

*22.* **Annual budget.-**

The Member-Secretary of the Executive Committee shall, at the beginning of each financial year, cause preparation of an annual budget containing the details of the proposed income and expenditure on activities covered in the annual plan for that particular financial year, including the legal, administrative and other costs and expenditure proposed to be incurred by the Trust together with details of the funding requirements in this regard, to be referred as the annual budget.

*23.* **Approval of the annual plan and the annual budget.-**

*(1)* The annual plan and the annual budget shall be laid before the Governing Body for its approval.

*(2)* The Member-Secretary of the Executive Committee shall, on receipt of the copies of the duly approved annual plan and the related annual budget from the Convener of the Governing Body, submit the same to the State Government within a period of thirty days from the date of receipt of approval of the Governing Body.

*(3)* Without prejudice to the provisions of sub-rule *(2)*, the Trust may undertake expenditure for activities that are not approved in the annual plan subject to specific approval by the Chairperson,

Governing Body, which shall be laid before the Governing Body in the next annual budget.

*(4)* The annual plan and related annual budget may be amended at any time subject to the approval of the Chairperson, Governing Body, which shall be laid before the Governing Body in the next year plan or budget.

*24.* **Annual report.-**

*(1)* The Member Secretary of the Executive Committee shall, within ninety days of the end of each financial year, submit an annual report containing such information as deemed appropriate by the Executive Committee.

*(2)* The annual report shall be approved by the Executive Committee and shall contain details, *inter alia,* of the activities completed by the Trust during the financial year and the expenditure incurred by the Trust during such financial year.

*(3)* A copy of the annual report shall be sent to the Government within a period of thirty days from the date of its approval by the Executive Committee after approval of the Governing Body.

*25.* **Financial year.-**

*(1)* The accounting or financial year of the Trust shall be from the 1st of April to the 31st of March.

*(2)* The first year of operations of the Trust may be a partial year.

*26.* **Maintenance and audit of accounts.-**

*(1)* The accounts of the Trust shall be maintained in the form, mode and manner as may be decided by the Executive Committee.

*(2)* The accounts of the Trust Fund shall be audited in such manner as may be decided by the Executive Committee.

*(3)* After the audit referred to in sub-rule (2), the Trust shall submit the annual report to the Governing Body.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

LAXMIKANT DHOKE,
Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR.